**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, अमरावती यांनी पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग (वर्धा जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी प्रस्तावित प्रकल्पाची दि. २६/११/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, अमरावती यांनी पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग (वर्धा जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २६/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता **होटल हरीराम टॉवर, मुरारका लेआऊट, दादाजी धुनीवाला मठाजवळ, वर्धा** येथे श्री. संजय तेली, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

## पार्श्वभूमी

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, अमरावती यांनी पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग (वर्धा जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता अर्ज म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे दि. १०/०९/२०२५ रोजी सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मंडळाच्या मुख्यालयाने पत्र क्र. MPCB/JD/WPC/ENV-PH/B-२५०९१२-FTS-०१९८ दि. १२/०९/२०२५ अन्वये जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २१/१०/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत सहा निवेदने म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-३)**. मंडळाचा आदेश क्र. ई-४२/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-251031-FTS-0050 dtd.31/10/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-४)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि.सिंधुदुर्ग) शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग (वर्धा जिल्ह्यातील भाग) बांधकामासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. विजय धर्मासरे, देवळी.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी शेती देवळी येथे आहे. जमिनीच्या मोजनीवेळी शासकीय यंत्रणेकडून कुठलिही सूचना प्राप्त झालेली नाही. तसेच पंचनाम्याची प्रत देण्यात यावी. | मोजणीच्या वेळी पंचनामा तयार करण्यात येतो. सदर पंचनाम्याची प्रत संबंधित जमीन अभिलेख विभागाकडून (Land Records Department) प्राप्त करून घेता येईल. तसेच यासंदर्भात संबंधित शासकीय यंत्रणेकडून आवश्यक ती सूचना व माहिती वेळोवेळी देण्यात येईल. |
| २ | माझ्या शेतामधून महामार्ग प्रस्तावित असल्यामुळे शेतीचे दोन तुकडे पडणार आहेत. महामार्ग जवळपास १० फुट उंच असल्यामुळे लगतच्या जमिनीचा पाण्याचा निचरा कसा होईल? यावर कोणती उपाययोजना केली आहे. | महामार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर कल्व्हर्ट व अंडरपास देण्यात येतील, जेणेकरून पावसाचे पाण्याचा निचरा होईल व महामार्ग ओलांडणे सोपे होईल. |

२) श्री. नरेन्द्र इंगळे, काजलसरा.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या प्रकल्पाचा डीपीआर ऑनलाईन किंवा पीडीएफ स्वरूपात मिळणार काय. | या प्रकल्पाचा डीपीआर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यालयातून प्राप्त करून घेऊ शकता. |

३) श्री. विरेन्द्र दरणे, वाभगांव

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या द्रुतगती महामार्गामुळे हवा प्रदूषित होवून श्वसनाचे आजार वाढतील. तसेच ध्वनी प्रदूषणामुळे गावांतील शांतता भंग होईल. | बांधकामादरम्यान २-३ प्रकारचे प्रदूषण होऊ शकते –ध्वनीचे, वायूचे, पाण्याचे. याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सर्व उपाययोजना करण्यात येतील. महामार्गावरून वाहतूक सुरु झाल्यानंतर ध्वनी प्रदूषणाकरीता नागरी वसाहतींच्या जवळ ध्वनीरोधक बसवले जातील. |
| २ | समृध्दी महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात झालेले आहेत. या अनुषंगाने या महामार्गावर कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. | मुद्दयाची नोंद घेण्यात आली. |
| ३ | जमिनीच्या मोजनी दरम्यान शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची सूचना प्राप्त झालेली नाही. तसेच बऱ्याच मोजनी शीटमध्ये झाडांची नोंद नाही. | मोजणीच्या वेळी पंचनामा तयार करण्यात येतो. सदर पंचनाम्याची प्रत संबंधित जमीन अभिलेख विभागाकडून (Land Records Department) प्राप्त करून घेता येईल. तसेच यासंदर्भात संबंधित शासकीय यंत्रणेकडून आवश्यक ती सूचना व माहिती वेळोवेळी देण्यात येईल. |

४) श्री. हर्षवर्धन घोल्हर, देवळी

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | द्रुतगती महामार्ग देवळी नगर परिषदेच्या हद्दीतुन प्रस्तावित आहे. एमआयडीसी देवळी तसेच बुटीबोरी-तुळजापूर महामार्ग देखील गावालगत असल्याने गावांतील प्रदूषण वाढेल. यामुळे प्रस्तावित महामार्ग १ ते २ कि.मी. गावाबाहेरून वळविण्यात यावा. | प्रस्तावित महामार्गाच्या संरचनेला महाराष्ट्र शासनाकडुन मंजुरी मिळालेली आहे. सदर संरचना शासनाने ठरवून दिलेल्या ISO मानकाप्रमाणे अभ्यास करून, अनेक पर्यायांचे तुलनात्मक विश्लेषण केले जाते व ज्या पर्यायाला सर्वाधिक गुण मिळतात तो पर्याय अंतिम करण्यात येतो. |

५) श्री. मंगेश भूसे, पडेगांव

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | शेतीचे दोन तुकडे पडणार आहेत. यामुळे एक शेतातुन महामार्ग ओलांडून दुसऱ्या शेतात जाण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात येईल. | महामार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर कल्व्हर्ट व अंडरपास देण्यात येतील, जेणेकरून पावसाचे पाण्याचा निचरा होईल व महामार्ग ओलांडणे सोपे होईल. |
| २ | लगतच्या जमिनीचा पाण्याचा निचरा कसा होईल? यावर कोणती उपाययोजना केली आहे. | |

| | | |
|---|---|---|
| ३ | जमिनीचा मोबदला किती व कसा मिळणार. | शासनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय सदस्य असलेली समिती गठीत केली जाते व मोबदल्याबाबत सदर समिती निर्णय घेते. |

**६) श्री. गणेश वानखेडे, धोत्रा (रेल्वे)**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | हा महामार्ग धोत्रा (रेल्वे) या गावाच्या कोणत्या भागातून जाणार आहे, याबाबत विस्तृत माहिती दयावी. | या प्रकल्पाचा डीपीआर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यालयातून प्राप्त करून घेऊ शकता. |

**७) श्रीमती. व्ही.एन.खंडेराव, ग्रामपंचायत अधिकारी, इसापूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझ्या गावांतील लोकांना ज्या विहिरीतून पाणी पुरवठा होत आहे, ती विहिर, पाईपलाईन व स्वीच रूम महामार्गात जात आहे. यावर पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. | मुद्दयाची नोंद घेण्यात आली. |

**८) श्रीमती. मंजुषा बोबडे, ग्रामपंचायत, वाटखेडा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाटखेडा ते काजलसरा पांदण रस्त्यावर तीन वर्षाआधी मनरेगा अंतर्गत ६०० वृक्षांची लागवड करण्यात आली होती. ही सर्व झाडे महामार्गात जाणार आहेत. | वर्धा जिल्ह्यात सुमारे ११,५०० झाडं बाधित होतील. महामार्ग पूर्ण होताच दोन वर्षाच्या कालावधीत ५२,००० झाडांची लागवड केली जाईल व त्यानंतर पाच वर्षे त्यांची देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराकडून केली जाईल. |

**९) श्री. नितीन इंगोले, ग्रामपंचायत अधिकारी, काजलसरा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाटखेडा ते काजलसरा पांदण रस्त्यावर आमच्या गावामार्फत देखील वृक्षांची लागवड करण्यात आली होती. ही सर्व झाडे महामार्गात जाणार आहेत. वृक्ष लागवडीसाठी नव्याने उपाययोजना करावी. | वर्धा जिल्ह्यात सुमारे ११,५०० झाडं बाधित होतील. महामार्ग पूर्ण होताच दोन वर्षाच्या कालावधीत ५२,००० झाडांची लागवड केली जाईल व त्यानंतर पाच वर्षे त्यांची देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराकडून केली जाईल. |

**१०) श्री. देवेन्द्र, देवळी**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या महामार्गामुळे किती वृक्ष तोडण्यात येतील व त्या बदल्यात किती वृक्षांची लागवड करण्यात येईल. | वर्धा जिल्ह्यात सुमारे ११,५०० झाडं बाधित होतील. महामार्ग पूर्ण होताच दोन वर्षाच्या कालावधीत ५२,००० झाडांची लागवड केली जाईल व त्यानंतर पाच वर्षे त्यांची देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराकडून केली जाईल. |

११) श्री. इरफाण पठाण, सावंगी (मेघे)

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या महामार्गा अंतर्गत किती अंतरावर पथकर उभारण्यात येणार व पथकर भाडे किती राहील. | महामार्गाच्या Entry interchange व Exit interchange वर पथकर उभारण्यात येतील. पथकर भाडे शासनाद्वारे ठरविण्यात येतील. |

१२) श्री. विनय महाजन, इसापूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | जमिनीचा एकरी किती मोबदला देण्यात येईल. | शासनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय सदस्य असलेली समिती गठीत केली जाते व मोबदल्याबाबत सदर समिती निर्णय घेते. |
| २ | माझी शेती प्रस्तावित द्रुतगती महामार्गामध्ये गेलेली असून काही उर्वरीत शेती जसे ५ आर/१० आर याबाबत कोणता निर्णय घेण्यात येईल. | भूमी अधिग्रहणाबाबत जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांची समिती नेमली जाते व सदर समिती याबाबतीत योग्य तो निर्णय घेईल. |
| ३ | शेतीचे दोन तुकडे पडणार आहेत. यामुळे एक शेतातुन महामार्ग ओलांडून दुसऱ्या शेतात जाण्यासाठी कोणती व्यवस्था करण्यात येईल. | महामार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर कल्व्हर्ट व अंडरपास देण्यात येतील, जेणेकरून पावसाचे पाण्याचा निचरा होईल व महामार्ग ओलांडणे सोपे होईल. |

१३) श्री. विजय पोटे, इसापूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी शेती यशोदा नदीला लागुन आहे. महामार्गामुळे नदीचे पाणी अडल्यामुळे संपूण गांव बाधीत होईल. | कोणत्याही नैसर्गिक नदी व नाल्यांना अडथळा निर्माण होणार नाही. सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम करण्यात येईल. |
| २ | शेतात जाण्यासाठी वापरण्यात येणार कॅनलरोड प्रस्तावित महामार्गामुळे बंद होईल. पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यात यावी. | महामार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर कल्व्हर्ट व अंडरपास देण्यात येतील, जेणेकरून पावसाचे पाण्याचा निचरा होईल व महामार्ग ओलांडणे सोपे होईल. |
| ३ | इसापूर गांव देवळी एमआयडीसी लगत असल्यामुळे येथील जमिनीचे मुल्यांकन एमआयडीसीतील व देवळी शहरातील जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे करण्यात यावे. | शासनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय सदस्य असलेली समिती गठीत केली जाते व मोबदल्याबाबत सदर समिती निर्णय घेते. |

१४) श्री. सुरेश वडकरे, दिग्रस

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी शेती रस्त्याला लागुन असल्यामुळे बाजार मुल्यांकन (Commercial Value) जास्त आहे. इतर पडीत शेतींचे बाजार मुल्यांकन तुलनेने कमी आहे. यामुळे मोबदला देतांना बाजार मुल्यांकन गृहित धरून त्याप्रमाणेच देण्यात यावा. | शासनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय सदस्य असलेली समिती गठीत केली जाते व मोबदल्याबाबत सदर समिती निर्णय घेते. |

अध्यक्ष, लोकसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांनी उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली याबाबत आभार प्रकट केले व उपस्थित केलेल्या मुद्द्यांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेवून शासनास सादर करण्यात येईल. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करणे किंवा इमेलद्वारे म.प्र.नि.मंडळ, कार्यालय, नागपूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे जमा करण्याबाबत सुचित केले. तसेच उपस्थित जनतेचे आभार मानले. त्यानंतर सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(संजय तेली)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा